कीडनियंत्रण

# खरीप कांद्यातील फुलकिडीचे नियंत्रण




**डॉ. मंगेश बडगुजर**
(मो.नं. ९४२२७७११२६)
**डॉ. राकेश सोनवणे**
**डॉ. जितेंद्र ढेमरे**
सहायक कीटकशास्त्रज्ञ,
कांदा व द्राक्ष संशोधन केंद्र,
पिंपळगाव बसवंत, जि. नाशिक




फुलकिडींची पिल्ले



फुलकिडींचा प्रौढ



फुलकिडींचा प्रौढ- सूक्ष्मदर्शकामध्ये



कांद्याच्या पातीमधील फुलकीड



फुलकिडीमुळे झालेले चंदेरी पट्टे



फुलकिडींमुळे वाळत आलेला कांदा

फुलकिडे (टाक्या) ही कीड कांदा पिकाचे नुकसान करणारी प्रमुख कीड आहे. पूर्ण वाढलेल्या किडी सुमारे १ मिलिमीटर लांबीच्या असतात. त्यांचा रंग पिवळसर तपकिरी असतो व त्यांच्या शरीरावर फुलीच्या आकाराचे गडद चट्टे असतात. फुलकिड्यांमुळे कांद्याचे उत्पादन ३० ते ४० टक्क्यांपर्यंत घटू शकते.

खरिपात सप्टेंबर महिन्यात ज्या ठिकाणी पाऊस नसेल आणि तापमान वाढलेले असेल त्या क्षेत्रात फुलकिडींचे प्रमाण वाढते. अशा वेळेस फुलकिडींचे नियंत्रण व्यवस्थित झाले नाही तर आपल्याला कांदा उत्पादनामध्ये घट झालेली आढळून येते. त्यासाठी कांद्यावरील फुलकिडींचे वेळीच नियंत्रण करणे आवश्यक ठरते.

**फुलकिडे किंवा टाक्या** (Thrips) :

**वर्ग**– थायसॅनोप्टेरा (Thysanoptera)

**कुळ**– थ्रीपीडी (Thripidae)

**शास्त्रीय नाव**– थ्रीप्स टॅबॅकाय लिंडेमन (Thrips tabaci Lindeman

**किडींची ओळख** : फुलकिडे (टाक्या) ही कीड कांदा पिकाचे नुकसान करणारी प्रमुख कीड आहे. पूर्ण वाढलेल्या किडी सुमारे १ मिलिमीटर लांबीच्या असतात. त्यांचा रंग पिवळसर तपकिरी असतो व त्यांच्या शरीरावर फुलीच्या आकाराचे गडद चट्टे असतात. फुलकिड्यांमुळे कांद्याचे उत्पादन ३० ते ४० टक्क्यांपर्यंत घटू शकते. कोरडी हवा आणि २५ ते ३० अंश सेल्सियस तापमानात (फेब्रुवारी ते एप्रिल) फुलकिड्यांची वाढ अधिक प्रमाणात होते.

**किडीचा जीवनक्रम** : फुलकिड्यांची मादी प्रतिदिवस ४–६ याप्रमाणे एकूण ५०–६० पांढऱ्या रंगाची अंडी कांद्याच्या पातीवर घालते. पिलांचा जगण्याचा कालावधी साधारणपणे ६–७ दिवसांचा असतो. डिसेंबर महिन्यात किडी सर्वाधिक काळ (२३ दिवस) जगतात तर एप्रिल महिन्यात सर्वात कमी (१३ दिवस) जगतात. पिले व प्रौढ कीटक पानांचा रस शोषून घेतात. किडींनी असंख्य चावे घेतल्यामुळे पानांवर पांढुरके ठिपके पडतात. त्यालाच टाक्या या नावाने ओळखले जाते. असंख्य ठिपके जोडले गेल्यामुळे पाने वाकडी होतात व वाळतात. रोपावस्थेत किडींचा फार मोठा प्रादुर्भाव झाला तर महत्त्वाची पाने वाळल्यामुळे कांदे पोसत नाहीत. कांदा तयार होत आला असताना प्रादुर्भाव झाला तर झाडाची प्रवृत्ती नवीन पाने बाहेर टाकण्याकडे होते. त्यामुळे माना जाड होतात. कांदा साठवणीत टिकत नाही. फुलकिड्यांनी केलेल्या जखमांमधून काळा करपा, जांभळा करपा किंवा तपकिरी करपा या रोगाच्या बुरशीसह पानात सहज शिरकाव करता येतो.

**बंदोबस्तासाठी उपाययोजना** : पिकांची फेरपालट करावी. कांदा रोपे १५ दिवस लावण्याअगोदर शेताच्या कडेने मक्याच्या दोन ओळी लावल्या तर कांदा पिकाच्या कडेने सजीव कुंपण तयार होते. त्यामुळे शेजारील शेतकऱ्यांच्या शेतातील फुलकिड्यांचा उपद्रव कमी होतो. २ फवारण्या कमी केल्या तरी फुलकिड्यांचा बंदोबस्त चांगला करता येतो. लागवडीपूर्वी रोपांची मुळे कार्बोसल्फान २५ ई.सी. २० मि.लि./ १० लि. या प्रमाणात द्रावण करून त्यात बुडवावीत व नंतर लागवड करावी. कांदा रोपे लावणीनंतर थायमेट १० जी किंवा कार्बोफ्युरॉन १० जी ही औषधे एकरी ४ किलो या प्रमाणात वाफ्यात टाकावीत.

लागवडीनंतर ३० दिवसांनी ६५–७० टक्के आर्द्रता असताना व्हर्टिसिलियम लेकॅनी ५ ग्रॅम/ लि. पाण्यातून ८–१० दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. त्यानंतर ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी.

तक्त्यात दर्शविलेले कोणतेही एक कीटकनाशक आलटून पालटून १५ दिवसांच्या अंतराने किडींच्या प्रादुर्भावानुसार फवारणी करावी.

| अ. नं. | कीटकनाशकाचे नाव | क्रियाशील घटक (मि.लि./ ग्रॅम) | फॉर्म्युलेशन (मि.लि./ ग्रॅम) | पाण्याचे प्रमाण (लिटर) | प्रतीक्षा कालावधी (दिवस) |
|---|---|---|---|---|---|
| १ | डायमेथोएट ३०% ईसी | २०० | ६६० | ५००–१००० | –– |
| २ | फिप्रोनिल ८०% डब्ल्यूजी | ६० | ७५ (१.५ ग्रॅम/ १० लि.) | ५०० | १५ |
| ३ | लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ५% ईसी | १५ | ३०० (७.५ मि.लि./ १० लि.) | ३००–४०० | ५ |
| ४ | ऑक्सिडेमेटॉन मिथाईल २५% ईसी | ३०० | १२०० (१२ मि.लि./ १० लि.) | ५००–१००० | –– |

■